# पानफुटी

**_Bryophyllum pinnatum_ (Lam.) Oken.** **Family. – Crassulaceae**





**विविध भाषांमधील नावे:**
संस्कृत: पर्नबीज, रक्तकुसुम; मराठी: पानफुटी, हिंदी: अमर पोई; इंग्लिश: कॅथेड्रल बेल्स, डाँकी इयर्स प्लांट

**Morphology:**
The plant grows to about 3-6 feet tall. Stem erect, thick, succulent; leaves large, fleshy, each with 3 or 5 oval leaflets with round-toothed edges. Young plantlets develop along the margins of the mature leaves; flowers attractive, in drooping blooms borne on large panicles, purple or yellowish-white tinged calyxes and reddish corollas.

**वनस्पतीचे वर्णन:**
ही वनस्पती भारतात सर्वत्र आढळते. याची उंची साधारणपणे २ - ३ फूट असते पाने जाड, दात्रेदर, अंडाकृती, मोठी असतात. फुले वनस्पतीच्या टोकाला तुऱ्यांमध्ये येतात.

**बहर  येण्याचा कालावधी :**डिसेंबर ते फेब्रुवारी

**औषधी उपयोग:** आयुर्वेदात पानफुटी चा उपयोग किडनी आणि मूत्राशय संबंधी विकारांमध्ये केला जातो. पानफुटीच्या पानांचा वापर अनेक आरोग्य समस्यांवर केला जातो. पोटासंबधी विकार, मूत्राशयासंबधी समस्या, किडनीस्टोन, मुळव्याध, जखमा बऱ्या करण्यासाठी पानफुटीच्या पानांचा वापर केला जातो. याशिवाय त्रिदोष आणि रक्तशुद्धी इत्यादी अनेक रोगांमध्येही पानफुटी उपयोगी आहे. पानफुटी वनस्पती तुम्ही तुमच्या घरी कुंडीत देखील लावू शकता. ज्यामुळे कधीही या वनस्पतीचा वापर तुम्हाला करता येईल.

**लागवड:**
पानफुटी ही एक घरामध्ये किंवा बागेमध्ये शोभिवंत वनस्पती म्हणून लावली जाते. याची लागवड पानाचा किंवा पानांच्या  छोट्या रोपांचा उपयोग करून  केली जाते. उष्णप्रदेशामध्ये व पाण्याचा निचरा उत्तम होणाऱ्या जमिनीमध्ये या वनस्पतीची वाढ चांगल्या प्रकारे होते.